# नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

फाउंटन दुरसंचार इमारत क्र.१, ७ वा मजला, एम.जी.रोड, हुतात्मा चौक, फोर्ट, मुबई – ४०० ००१.

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्र. :- ०२२-२२६२१९७८/२२६२१९६८ | फॅक्स क्र.०२२ – २२६२२०२२ |
| Email Add :- dclmms@yahoo.in / dclmms_complaints@yahoo.com | |
| जा.क्र.वैमाशा-१४/पंप पडताळणी/२०२०/354 | दि. २४/०२/२०२१ |


प्रति,

सहनियंत्रक,
वैध मापन शास्त्र,
सर्व विभाग

विषय- डिझेल/पेट्रोल पंप पडताळणीबाबत.

संदर्भ- १) महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघ मर्यादित संघ मर्यादित, मांडवी कोळीवाडा,मस्जिद, मंबई-९ यांचे दि-१८/०१/२०२१ रोजीचे पत्र.
२) मरिन सर्व्हिसेस, न्यू फेरी वार्फ, मुंबई-९ यांचे दि-०९/०२/२०२१ रोजीचे पत्र.
३) आर.बी.ट्रेडर्स, डॉकयार्ड रोड रेल्वे स्टेशन समोर,मुंबई-१० यांचे दि-११/०२/२०२१ रोजीचे पत्र.
४) मे. चमन ऑटोमोबाईल्स, यांचे दि-११/०२/२०२१ रोजीचे पत्र.
५) हिदूस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, जमशेदजी टाटा रोड, मुंबई-२० यांचे दि-१७/०२/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने दक्षिण मुंबई विभाग तसेच इतर ठिकाणी पेट्रोल /डिझेल वितरण पंपाच्या फेरपडताळणी व मुद्रांकनास विविध कारणांनी संबंधित विभाग निरीक्षकांनी नकार दिल्याच्या तक्रारी पेट्रोल /डिझेल वितरण कर्ते तसेच तेल विपणन कंपन्यांद्वारे या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रांरीमध्ये नमद केल्यानुसार मां.संचालक वैध मापन शास्त्र,नवी दिल्ली यांच्या दि. ०६.१०.२०२० तसेच यापूर्वीच्या पत्रांचा आधार घेवून नकार देण्यात आलेला आहे. परंतू काही ठिकाणी मात्र फेरपडताळणी व मुद्रांकन करण्यात आले आहे.

वास्तविक मां.संचालक वैध मापन शास्त्र,नवी दिल्ली यांच्या पत्रांनुसार पेट्रोल /डिझेल वितरण पंपाचे अपग्रेडेशन हा तत्कालिन तसेच दिर्घकालिन करावयाच्या उपाययोजनेचा भाग आहे असे स्पष्ट नमुद केले आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाद्वारे तेल वितरण कंपन्यांना केलेली असून या बाबत अपग्रेडेशन संदर्भात तेल विपणन कंपन्यांनी या कार्यालयाकडे मार्च २०२२ पर्यंत मुदत मागीतली आहे तसेच इतर आवश्यकत्या उपाययोजना करण्याबाबत कळविले आहे

पेट्रोल /डिझेल अत्यावश्यक सेवेत येत असल्याने फेरपडताळणी व मुद्रांकनासाठी सादर केलेल्या अर्जास नकार दिल्याने शासनाचा महसूल थांबेल तसेच विभागातील कर्मचा-यांबाबत नकारात्मक भूमिका तयार होईल वरील बाबींचा विचार करता निरीक्षकांनी फेरपडताळणी व मुद्रांकनाचे काम मार्च २०२२ पर्यंत करुन देण्यात संबंधित क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात यावे.

(डॉ. रविंद्र कुमार सिंगल)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र
महाराष्ट्र राज्य, मुंबई